# प्रकरण – 3 रे

## 'बाइदेवबास चरित्र आणि व्यक्तिमत्व'

पृष्ठ क्र. 19 ते 24

## * प्रकरण – 3 रे *

### – बाइदेवबास चरित्र आणि व्यक्तिमत्व –

आजच्या अहमदनगरच्या पूर्वेस 2–3 मैलावर भिंगार नावाचे गांव आहे. "बाइदेव" या भिंगारचे रहाणारे होते. बाइदेवाचा जन्मकाल शके 1185–86 च्या दरम्यानचा असावा.[1]

भिंगार गावच्या आदित्याच्या मंदीरात चक्रधरांचा 15 दिवस मुक्काम होतो. बाइदेवांच्या वडिल भावाचे नाव लक्ष्मीदेव होते. त्याला भूतपिशाच्च बाधा झालेली होती. त्यामुळे त्याला देवासंबंधाने असन्निधान होते. आई बापडी काळजीत होती. चक्रधरस्वामींचे वास्तव्य गावच्या मंदिरामध्ये आहे हे कळताच आशेने लक्ष्मीदेव व बाइदेव या दोघा पुत्रांना घेऊन स्वामी बसले होते त्या चौकात बाइदेवांची आई आली व तिने चक्रधरांना दंडवत घातले आणि विनवणी केली की, या मुलाची भूतबाधा जाऊ दे, ( लक्ष्मीदेवाची ) त्यावर स्वामी म्हणाले " या, या, लक्ष्मीदेवा या, आमच्या जवळ या." चक्रधर असे म्हणतात न् म्हणतात तोच लक्ष्मीदेव पळाला व आदित्याच्या देवळात लपला. चक्रधर पाठोपाठ आले. त्यांना पाहून लक्ष्मीदेव देवळावर चढला. पाठोपाठ चक्रधरही चढले, तेव्हा लक्ष्मीदेव भराभरा खाली उतरला व त्याने सांडपाण्याच्या मोरीत तोंड खुपसले. त्याचे भूत पळाले. स्वामी खाली आले. बाइदेवाला मात्र चक्रधरांचे सन्निधान लाभले[2] लक्ष्मीदेवाच्या या घटनेपासून बाइदेव चक्रधरांच्या जवळच राहू लागला. चक्रधरशिष्या बाइसा, बाइदेव आणि मंडळी एकत्र झोपत. बाइदेव लहान होते साधारणतः 4/5 वर्षांचे असावे. रात्री लघुशंका लागली की ते म्हणत, मुती लागली., त्यावर बाइसा जाग्या होत व म्हणत "उठ शिष्या ऊठ ! मी तुला बाहेर घेऊन जाते." बाइदेवतिला नकार देत म्हणून चक्रधर स्वतःच उठून त्याला हाताला धरून उठवीत म्हणत, " भागदेयो ऊठ बाबा, मग बाइदेव लघूशंका करीत त्यावेळी स्वामींच्या अंगावर मुत्राचे शिंतोडे उडत असत. नंतर बाइसा चक्रधरांचे चरण धूत असे[3].

लहानपणापासूनच बाइदेव चक्रधरांचे भक्त होते. भिंगारलाच असताना त्यांनी एकदा चक्रधरस्वामींसाठी गोड गोड बोरे वेचून आणली. प्रथम स्वतः बोरे चाखून पाहिली व त्यातील चांगली बोरे चक्रधरांना अर्पण केली.[4]

स्वामींनी बोरांचा स्वीकार करून एकदोन बोरे खाल्ली सुध्दा. उरलेली बोरे बाइसाकडे दिली तेव्हा त्या चक्रधरांना म्हणाल्या." बाबा ही तर उष्टी बोरे आहेत. त्यावर चक्रधर म्हणाले." बाई ही बोरे उष्टी आहेत पण ह्याचा भक्तिभाव तर उष्टा नाही ना? रामाला शबरीने बोरे दिल्याचा सर्वश्रुत संदर्भ इथे आवर्जून आठवतो. अजूनही भिंगारजवळ असलेल्या नागरदेवळे या गावची बोरे प्रसिध्द आहेत.

काही शेतकरी एकदा कणगीतून चणे काढीत होते. बाइदेव तिथे गेले. त्यानी त्या चण्यातील चांगले पांढरे चणे निवडून वोटीभर आणले व चक्रधर स्वामींना म्हणाले, " प्रभू तुमच्यासाठी चणे आणले आहेत. त्यांचा स्वीकार व्हावा." चक्रधरांनी त्या चण्यांचा स्वीकार केला व मग चक्रधरांसह सर्वांनी ती उसळ खाल्ली.[5]

बाइदेव एकदा अटन करण्यास निघाले होते. तेव्हा नागदेवाचार्य त्यांना म्हणाले." बाइदेवा अटन करता करता स्थाननिर्देश करावा" सर्व स्थानांना नमस्कार करावा. नागदेवाचार्यांनी त्यांना काही विधी सांगितला त्याप्रमाणे बाइदेवांनी चक्रधरांची सर्व स्थाने नमस्कारिणी दिली. याचवेळी त्यांनी स्थानपोथीचे प्रथम व कच्चे टाचण तयार केले असावे. स्थानपोथीत भिंगारचे जे वर्णन आहे, ते अत्यंत अचूक आहे. आजही भिंगारला स्थानपोथीतील वर्णनाप्रमाणे देऊळ, दरवाजा, ओटा, मादनस्थान, बडव्यांचे घर, बाजार, देवीचे देऊळ इ. ठिकाणे आढळून येतात. बाइदेव भिंगारचे असल्यामुळे इतका तंतोतंतपणा आढळत नसेल ना ? असे के. सी. क-हाडकर लिहतात.[6]

महानुभाव पंथात तत्वज्ञानाचे गाढे व्यसंगी पंडीत आहेत. नागदेवाचार्य हे वेळोवेळी आपल्या शिष्यांना तत्वज्ञानाचा उपदेश करताना दिसतात. त्याप्रमाणेच बाइदेवांनाही तत्वज्ञानाचे अधिकारी म्हणून मान्यता होती. हे खालील घटनेवरून लक्षात येईल.[7]

भास्करभट्ट बोरीकरांनी आपला "शिशुपालवध" ग्रंथ तयार झाल्यावर बाइदेवांना अभिप्रायार्थ दाखविला तेंव्हा बाइदेवांनी आपले स्पष्ट मत देताना म्हटले होते "हा ग्रंथ चांगला झाला आहे. पण तो प्रवृत्ताजोगा शृंगारप्रधान झाला आहे. निवृत्ताजोगा नाही." पंथात तत्वज्ञानाच्या दृष्टीने हे मत अतिशय योग्य असल्याचे लक्षात येईल".

महानुभाव पंथियांचे श्रद्धास्थान म्हणूनदेखिल बाइदेवांकडे पाहिले जाते. ते खाली प्रसंगावरुन लक्षात

येईल.

एकदा परशरामबास व बाइदेवबास अनोबासाकडे पाहुणे म्हणून गेले होते. रीतीरिवाजाप्रमाणे अनोबासाने बाइदेवबासांचे पाय धुतले मात्र परशरामबास पाय धुवू देईना. तो म्हणू लागला, " अनोबा तुम्ही आमचे गुरु, तुम्हाला आमचे पाय धुता येणार नाहीत" त्यावर अनोबास म्हणाले, " पाय–या सोन्याच्या झाल्या तरी त्यावरुन चाललेच पाहिजे, त्या डोक्यावर घेऊन थोडेच चालता येईल?" या भांडणात शेवटी बाइदेवांचा "लवाद" नेमण्यात आला. त्यावर बाइदेवबासांनी निर्णय दिला "ठायिक व "अभ्यगत" यांनी आदरातिथ्य करणे व करु देणे उचित आहे. योग्य आहे. अनोबास अगोदर येथे ठायिक आहेत. त्यांनी पाय धुणे उचित आहे. नंतर परशरामबास आपण शिष्य आहांत हे उचित आहे. प्रत्येकाचे खरे आहे. प्रत्येकाने आपापले कार्य करणे उचित होय."[8]

अशाप्रकारे हे भक्तीचे भांडण बाइदेवांनी सोडविले. यावरुन बाइदेवांच्यात चांगला सल्ला देण्याची म्हणजेच पंथीय उपदेश सांगण्याची शक्ती होती असे म्हणावे लागेल. द्वितियाचार्य म्हणून त्यांच्याकडे पाहताना त्यांचे वरील तत्वज्ञानाचे उपदेश वंदनीय ठरावेत.

बाइदेवबास हे अतिशय भावनाप्रधान वृत्तीचे हळव्या स्वभावाचे होते. ते त्यांना झालेले चक्रधरस्वामींच्या विरहाचे दुःख पाहिले की, आवर्जून ध्यानात येते ते असे की, शके 1194 च्या आसपास चक्रधरांनी उत्तरापंथे गमन केले त्यावेळी पंथाचे प्रथमाचार्य भटोबासांना उर्फ नागदेवाचार्यांना अत्यंत दुःख झाले. त्यांच्याबरोबर लक्ष्मीधरबाबा, बाइदेवबास आदी निवडक मंडळी बरोबर होती. त्यावेळी त्यांनी डोंबेगाव, रावसगाव, पैठण, वृद्धसंगम, जोगेश्वरी, पेहरासंगम, पेऊरगांव व छिन्नस्थळी इ. चक्रधरस्पर्शाने पावन झालेल्या स्थळांना भेटी दिल्या.[9] बाइदेव अर्थातच नागदेवाचार्यांबरोबरच होते. ज्यावेळी ते डोंबेगावास आले त्यावेळी बाइदेवांना भीतभंगाचा म्हणजेच भिंतीतून सुटलेला चिरा दिसला. पूर्वी त्या चि–यावर चक्रधर स्वामींनी पानाची पीक टाकली होती. त्यामुळे ते एक महानुभावियांचे प्रसादसेवेचे स्थान झालेले होते. प्रथमतः नागदेवांनी त्या चि–याची प्रसादसेवा केली. त्यांनी त्या चि–याला मुख लावले होते. नंतर बाइदेवबासांनी येऊन नागदेवाचार्यांना अनुसरले. नागदेवाचार्यांनी तिथेच पिकेच्या चि–याचे ज्ञान बाइदेवबासांना करुन दिले. मग

बाइदेवबासांनी लोटांगणच घातले. मुख सोलुन निघाले तरी बाइदेव प्रसाद सोडीत नव्हते. दुःखातिरेकाने बाइदेवांचे भानच हरपले. तेंव्हा मात्र स्वतः नागदेवाचार्यांनी त्याला सावरले.

डोंबेगावाहून ही सर्व महानुभाविय मंडळी बेलापुराला जाणार होती. परंतु चक्रधरस्वामींनी बेलापुरहूनच उत्तरापंथे गमन केलेले होते. जर का बेलापुरला गेल्यानंतर हे बाइदेवबासांना समजले असते, तर त्यांनी देहपात करुन घेतला असता. या रीतीने नागदेवाचार्य आपली तिर्थयात्रा बेलापूर टाळून करतात.

पिकेच्या प्रसादसेवेच्या प्रसंगावरून नागदेवाचार्यांना बाइदेवाच्या अनन्यभक्तीची कल्पना आलेली होती. म्हणून त्यांनी "बाइदेवोबा दुःखातिशयो : बोलापूरा न वचणे " असा निर्यय घेतला यात नवल नाही[10]

चक्रधरांच्या उ-तरापंथे गमनानंतर नागदेवाचार्य महानुभावपंथाचे प्रथमाचार्य झाले. नागदेवानंतर ' बाइदेव' आचार्य झाले. ते सुमारे तीन वर्षे आचार्यपदावर होते.

नागदेवचार्य श्री चक्रधरस्वामींच्या सान्निध्यात वयाच्या मोठेपणी आले. बाइदेवांना अगदी लहानपणापासून चक्रधारांचे सान्निध्य लाभले. श्री चक्रधरांच्याच कृपाछत्राखाली ते लहानाचे मोठे झाले. अगदी बालपणी चक्रधरांची वात्सलयपूर्ण वागणूक त्यांना लाभली होती हे त्यांचे भाग्य होय.[11]

बाइदेबास हे पंथाचे द्वितियाचार्य होते असे आधार देऊन डॉ. वि. भि. कोलते सांगतात. ते पुढीलप्रमाणे " बाइदेवया हा काळपर्यंत : सर्वज्ञाचिया प्रवृती : मीया सर्वज्ञाचा व्यापारू चालविलाः आता तुवां चालवावाः घाला गा तुम्ही समस्त बाइदेयासी दंडवत : आता समस्त तुम्ही याचीये 'अनुज्ञेवर्तावे " इतिहासप्रकरणातील या आधारावर कोलते 'बाइदेव' ना महानुभावांचा द्वितीय आचार्य ठरवितात.

वा. ना. देशपांडे देखिल " तै बाइदेवोबा आचार्ये होते" या आधारावर आपले मत मांडतात.

बाइदेवबास हे चक्रधरांचे शिष्य अनन्यनिष्ठ भक्त व त्यांच्यात भोळा भक्तिभाव, कमालीची विरक्ती दिसते. त्यांच्या नावावर पुढील ग्रंथरचना दिलेल्या आढळतात. 'पुजावसर' नामाचे दहा ठाय 'सठीप्रश्ने किंवा प्रश्नावली.[12]

' नित्यदिनीलीळा बाइदेवोबा डोंबेग्रामी बोलेती ' असा उल्लेख पूजावसरात येते. या नित्यदिनीलीळा म्हणजे 'प्रसादसेवा ' 'मुर्तिज्ञान' 'पूजावसर' व ' नामाचे दहा ठाय'अशी 4 प्रकरणे होत.[13]

बाइदेवांचा मृत्यूकाल स्थुलमानाने शके 1231 ( इ. स. 1309 ) असा डॉ. कोलते यांच्या मते आहे.[14] महामुभावपंथामधिल ' स्मृतिस्थळ ' या ग्रंथात किंवा ' लीळाचरित्रात' बाइदेवांच्या स्मृती किंवा उल्लेख फारच तुरळक कुठेतरी आहे. यावरून ते फार अबोल असावेत व चिंतनशील असावेत असे वाटते.

नित्यदिनीलीळा ( प्रसादसेवा. पूजावसर, मुर्तिज्ञान, नामाचे दहा ठाय,) या संप्रदायाच्या नित्यपाठात अंतर्भूत केलेल्या आहेत.

भोजनपूर्व नित्यपाठन वाचन. नित्यपाठाचे पारायण इ. प्रथा आजही संप्रदायात चालू असलेल्या दिसतात. यावरून महानुभावपंथियांत असलेले बाइदेवांच्या रचनेचे महत्व लक्षात येईल.

नागदेवाचार्य जेव्हा आचार्यपदावर होते. तेव्हा एकदा देमाईसाला स्वप्न पडले की, कोणी चार पुरूष रांजण उचलून नेत आहेत. ते पाहून देमाइसा म्हणाली, 'काइसया नयाल गा : असे म्हणून तिने तो रांजण पोटाशी धरला व नेऊ दिला नाही. तेव्हा त्या चौघापैकी एक म्हणाला, 'अगा! या आइचेया ओठी तीन अंजुली रत्ने घाला.

इतक्यात देमाइसा जागी झाली. तिने ते स्वप्न नागदेवाचार्यांना सांगितले. त्यांनी त्याचा अर्थ असा केला की, " आता मज सर्वज्ञाचा हाकारू येईल. रांजन तो मी : रत्ने तिथे सर्वज्ञाचा परिवार : तीने अंजुली तिथे तीन अधिष्ठाने:"

स्वप्नाचे असे स्पष्टीकरण करून आचार्य म्हणाले, " मज मागौता तीन अधिष्ठाने म्हणजे बाइदेवबास/ भावेदेव व्यास, कविश्वराचार्य व परशरामबास यांच्या कारकीर्दी होत.[15]

**संदर्भ :**

1. स्थानपोथी –संपा. वि. भि. कोलते अरूण प्रकाशन मलकापूर, पृ. 4.

2. लीळचरित्र पूर्वार्ध भा. 1 (संपा.) डॉ. शं. गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन, पहिली आवृती, पुणे 1966 क्रं. 160 पृ. 77

3. तत्रैव – लीळा क्रं. 161 पृ. 77

4. स्थानपोथी – संपा. वि. भि. कालते, अरूण प्रकाशन मलकापूर पृ . 4

5. उ. नि. लीळाचरित्र – लीळा क्रं. 162 पृ. 77

6. बाइदेवबासचरित्र व नित्यदिनीलीळा, संपा. के. सी. क–हाडकर, अहमदनगर, मे. 1977 पृ. 7

7. भास्करभट्ट बोरीकर, संपा. वि. भि. कोलते विदर्भ प्रकाशन संस्था, चरित्र व काव्य विवेचन, अमरावती, 1935 पृ 81

8. स्मृतिस्थळ – संपा. वा. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, सुधा आ. दुसरी, पुणे, 1960, स्मृति क्र. 163 पृ. 78

9. तत्रैव – स्मृति क्र. 6 पृ. 5

10. तत्रैव – स्मृति क्र. 9 पृ. 6.

11. बाइदेवबासचरित्र व नित्यदिनीलीळा, संपा. के. सी. क–हाडकर, अहमदनगर, मे 1977 पृ. 5.

12. तत्रैव – पृ. 10

13. नित्यदिनीलीळा संपा. ह. ना. नेने, अरून प्रकाशन, धनतोली नागपूर.

14. स्थानपोथी – संपा. डॉ. वि. भि. कोलते, अरूण प्रकाशन, मलकापूर, प्रस्तावना पृ. 4

15. महानुभावदर्शन – लेखक डॉ. अण्णासाहेब अडसोड. महानुभाव विश्वभारती, अमरावती 1872 पृ. 161.